लातूर जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सुशासनाचा चिकित्सक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेंतर्गत 'राज्यशास्त्र' विषयातील पीएच्.डी. (विद्यावाचस्पती)
पदवीसाठी सादर करावयाचा संशोधन आराखडा

संशोधक

बालाजी दिगंबर बिरादार

एम.ए., बी.एड.

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संजय मारोतीराव कोनाळे

एम.ए., नेट, पीएच.डी.

राज्यशास्त्र विभाग

शिवाजी महाविद्यालय, उदगीर

ता.उदगीर जि.लातूर.

संशोधन केंद्र

पीपल्स कॉलेज, नांदेड

जानेवारी - 2024

लातूर जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सुशासनाचा चिकित्सक अभ्यास

- **प्रस्तावना:**

लोकशाहीमध्ये विकेंद्रीकरणाची गुरुकिल्ली म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय. लोकशाहीमध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण व जनतेचा सहभाग महत्त्वाचा असतो. शासकीय सत्ता आणि अधिकार सरकारच्या विविध शाखांमध्ये आणि प्रशासनाच्या विविध स्तरांवर विभाजित करणे म्हणजेच सत्तेचे विकेंद्रीकरण होय. भारतात सत्तेचे विकेंद्रीकरण करताना राष्ट्रीय व राज्य स्तरावरील शासन संस्थेबरोबर स्थानिक स्तरावर सुद्धा सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. देशात विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने ग्रामीण व नागरी स्तरावर स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था हा शासनसंस्थेचाच एक प्रकार किंवा भाग होय. स्थानिक पातळीवरील सार्वजनिक स्वरूपाची, विशेषत: जनतेच्या प्राथमिक गरजांशी निगडित असलेली कामे करणाऱ्या संस्थांना 'स्थानिक स्वराज्य संस्था' असे म्हटले जाते. या संस्थांना 'स्थानिक शासन', 'स्थानिक प्रशासन संस्था', 'स्वशासन' अशा वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. भारतात 'स्थानिक स्वराज्य संस्था' या नावाने परिचित आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या पाठशाळा आहेत.

ग्रामीण व शहरी स्तरावरील स्वशासनाचा कारभार करणाऱ्या व्यवस्थेला स्थानिक स्वराज्य संस्था म्हणतात. त्याचबरोबर सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या तत्त्वानुसार नागरी पायाभूत सुविधा पुरविणाऱ्या स्थानिक पातळीवरील लोकनियुक्त संस्था म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे दोन प्रकार आहेत- 1) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था आणि 2) शहरी स्थानिक स्वराज्य

संस्था. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये गावपातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती आणि जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद तर शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये महानगरपालिका, नगरपालिका व कटक मंडळ या विविध संस्थांची निर्मिती करण्यात आली आहे. या विविध स्तरावरील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून स्थानिक प्रश्न सोडविण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला जातो. या स्थानिक स्वराज्य संस्था विकासामध्ये अत्यंत महत्त्वाची पार पाडताना दिसत आहेत. भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या एकूणच संरचना कार्यप्रणालीमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणण्यासाठी 1992 मध्ये 73 वी व 74 वी घटनादुरूस्ती कायदा संसदेने मंजूर केला. या कायद्याप्रमाणे ग्रामीण व नागरी शासन संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला. आज घडीला या संस्था संपूर्ण भारतभर ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी कार्य करताना दिसून येतात.

बलवंतराव मेहता समितीच्या शिफारशीनुसार 1959 मध्ये राजस्थान राज्यात पहिले पंचायतराज स्थापन झाले. त्यानंतर हळूहळू सर्व राज्यांमध्ये याची स्थापना झाली. महाराष्ट्राचा विचार करता राज्याची स्थापना 1 मे 1960 साली झाली. त्यानंतर मेहता समितीच्या शिफारशींवर अभ्यास करून महाराष्ट्रात स्थानिक स्वराज्य संस्थेची कशा पद्धतीने स्थापना करता येईल यासाठी महाराष्ट्राचे तत्कालीन महसूलमंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. या समितीने आपला अहवाल राज्य सरकारला सादर केला. तो अहवाल राज्य सरकारने ताबडतोब मान्य करून 'जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961' हा कायदा संमत केला. त्यानंतर या कायद्यास राष्ट्रपतीची मान्यता मिळाल्यानंतर 1 मे 1962 रोजी 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या उद्दिष्टयाने प्रेरित होऊन महाराष्ट्रात पंचायत समिती व जिल्हा परिषदेच्या पहिल्यांदा निवडणुका झाल्या. आजसुद्धा महाराष्ट्रात पंचायत समिती व जिल्हा परिषद यांचा कारभार 1961 च्या कायद्यानुसार

चालतो तर ग्रामपंचायतीचा कारभार मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 नुसार चालविला जातो.

स्थानिक स्वराज्य संस्थेची उद्दिष्ट्य पुढीलप्रमाणे आहेत. अ)स्थानिक पातळीवर लोकशाही प्रस्थापित करणे. ब) लोकशाहीत लोकांचा सहभाग वाढवणे आणि लोकांमध्ये राजकीय जागरूकता निर्माण करणे. क) स्वयंशासनाची संधी लोकांना देणे. ड) तळागाळातील लोकांच्या गरजा, परिस्थिती, समस्या, व्यवस्थायाकडे लक्ष देण्यासाठी स्थानिक पातळीवरचे शासन महत्त्वाचे ठरते. इ) उत्तरदायित्व आणि जबाबदारीची भावना लोकांमध्ये विकसित करणे.

जे.बी.से. क्लार्क यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबत असे म्हटले आहे की, "राज्य सरकार आणि जनता यामधील दुवा म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्था होय."

डब्ल्यू.इ. जॅक्सनच्या मते, "स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे विशिष्ट भागातील लोकांनी लोकशाही पद्धतीने निवडून दिलेल्या परिषदेकडून स्थानिक कारभाराचे व सेवांचे व्यवस्थापन व प्रशासन करणे होय."

ब्रिटानिका ज्ञानकोशाच्या मते, "स्थानिक शासन म्हणजे एकूण राज्याऐवजी अंतर्गतदृष्ट्या लहान भूभागात व्यवस्थापन करून निर्णय घेऊन त्याची कार्यवाही करणारी सत्ता होय."

राज्य सरकारमार्फत झालेली विकासाची कामे स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत नागरिकांचा विकास करणारी ठरतात. म्हणूनच लोकशाही शासन पद्धतीत स्थानिक स्वराज्य संस्थांना अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे.

लोकशाही शासन व्यवस्थेत 'सुशासन' संकल्पना सुद्धा अतिशय महत्त्वाची आहे. जी की स्थानिक जनतेच्या जीवनाशी निगडित आहे. एकविसाव्या शतकात जागतिकीकरणाच्या संदर्भात सुशासन व्यवस्थेची विशेष चर्चा होत आहे. जगातील

विकसित आणि विकसनशील देशांनी या संकल्पनेचा गांभीर्याने स्वीकार करण्यास सुरुवात केली आहे. आधुनिक काळात राज्य सरकार आणि प्रशासन यांचे स्वरूप कसे आहे यापेक्षा ते सरकार चांगले सरकार अथवा सुशासन आहे काय? याचा विचार होताना दिसत आहे. प्राचीन विचारवंत प्लेटोने आपल्या 'रिपब्लिक' या ग्रंथात आदर्श राज्याबाबत म्हटले आहे की, "आदर्श राज्य म्हणजे असे राज्य की राज्याची सर्व सत्ता आदर्श आणि उत्तम प्रशासकाच्या हाती असेल." हे मत आजच्या सुशासनास तंतोतंत लागू पडते. म्हणजेच कोणतेही राज्य आदर्श रूप तेव्हाच धारण करू शकेल जेव्हा त्याचे शासक कुशल, ज्ञानी व नि:स्वार्थी असतील. प्राचीन भारतीय विचारवंत कौटिल्य यांनीही आपल्या 'अर्थशास्त्र' या ग्रंथात असे मत मांडले आहे की, "उत्तम शासन कार्यासाठी महत्त्वाची बाब म्हणजे शासक सुशिक्षित असावा. तसेच राज्य नीतीची त्यास परिपूर्ण माहिती असावी. या शासकाने जनतेच्या कल्याणासाठी कार्य करावे." यावरून हे सिद्ध होते की, कौटिल्यानेसुद्धा सुशासनाचे मापदंड प्राचीन काळात सांगितले आहेत. आधुनिक काळात अस्तित्वात असलेल्या उदारमतवादी लोकशाही शासनव्यवस्थेत सार्वजनिक हीत या संकल्पनेस महत्त्व प्राप्त झाले आहे. सार्वजनिक हितासाठी ज्या विविध संस्थांची निर्मिती राज्यामार्फत केली जाते त्यांच्यात 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' ही कर्तव्यभावना निर्माण होणे आवश्यक आहे तरच खऱ्या अर्थाने उदारमतवादी लोकशाही सदृढ होईल.

उत्कृष्ट धोरणनिर्मितीत आणि त्याच्या अंमलबजावणीत सुशासनाचे सर्वोच्च प्रदर्शन असते. विसाव्या शतकात राज्य चालविण्यासाठी जी प्रशासन व्यवस्था निर्माण केली त्या प्रशासन व्यवस्थेत सुशासन (Good Governance) कधीच दिसून आले नाही. त्यामुळे तत्कालीन व्यवस्थेत प्रशासन हे साध्य तर नागरिक हे साधन बनले. यातूनच प्रशासकीय व्यवस्थेत लालफीतीचा कारभार, दप्तर दिरंगाई, भ्रष्टाचार,

जबाबदारीचा अभाव इ. दोष निर्माण झाले. हे दोष लक्षात घेऊन आंतरराष्ट्रीय संघटनेद्वारे शासन व्यवस्थेत सुधारणा करण्यासाठी अभ्यास केला गेला.

सुशासन संकल्पना साधारणत: 1990 नंतर विशेष चर्चेत आली. जागतिक बँकेने 1989 ला 'सुशासन' (Good governance) हा शब्दप्रयोग प्रथम केला. पुढे 1992 ला प्रकाशित झालेल्या अहवालात सुशासनासंबंधी सविस्तर चर्चा केली. त्यांनी आपल्या अहवालात तीन निकषांचा विचार करून सुशासनाची संकल्पना स्पष्ट केली. 1) शासनाचे स्वरूप कसे आहे? 2) देशातील सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थापनात सत्तेचा उपयोग कशा प्रकारे केला जात आहे? 3) सरकारमध्ये कुठपर्यंत आपले कार्य करण्याची क्षमता आहे? या घटकांवरच सुशासनाचे स्वरूप अवलंबून आहे.

नोकरशाहीचे सुनिश्चित उत्तरदायित्व, धोरणाची निर्मिती, माहितीची उपलब्धता, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, दक्ष, प्रभावी आणि सुलभ शासनाची निर्मिती, शासन, प्रशासन व सभ्य समाजात योग्य सुसंवाद, मानवी हक्कांचे रक्षण, सामाजिक न्याय व न्याय व्यवस्थेचे स्वातंत्र्य यांना महत्त्वाचे स्थान आहे. सुशासनामुळे पारदर्शकता निर्माण होऊन एक विश्वासाची लहर निर्माण होते. जेणेकरून सरकार कुठल्याही पद्धतीचे निर्णय न घेता ते तर्कावर आधारित तसेच उद्देशाभिमुख निर्णय घेण्यास बांधिल होतात.

मानव विकास अहवाल (2002) मध्ये सुशासनाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. "सुशासन म्हणजे शासकीय संस्थांची आणि नियमांची जास्तीत जास्त परिणामकारकता, पारदर्शीपणा, जनसहभाग, उत्तरदायित्व, पूर्णता जबाबदारी आणि कायद्याचे राज्य होय."

लोकशाही राज्यकारभारात कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देणे म्हणजे सुशासन होय. तसेच सुशासन म्हणजे पारदर्शक, उत्तरदायी, सर्वसमावेशक, प्रभावी आणि न्याय अशी शासनव्यवस्था होय. यानुसार सुशासनाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्था यांचा नागरिकांना सेवा देण्याच्या प्रक्रियेत सुलभता, तत्परता,

पारदर्शकता, कार्यक्षमता, गतिमानता, लोकसहभाग, उत्तरदायित्व व जबाबदारीची भावना निर्माण करणे महत्त्वाचे असते. एकूणच सुशासनाची संकल्पना लोकशाहीतील कार्यक्षम आणि परिणामकारक प्रशासनाशी संबंधित असून लोकांचे जीवनमान व राहणीमान उंचावण्यासाठी त्यांच्या उत्कर्षासाठी, भ्रष्टाचारमुक्त शासन निर्माण करण्यासाठी सतत कार्यतत्पर असणाऱ्या प्रशासनाशी सुशासन बांधिल आहे. प्रत्यक्षात सुशासन साकारण्यासाठी प्रबळ राजकीय इच्छाशक्ती, सामाजिक व राजकीय नैतिकता, देशाभिमान, राष्ट्रीय चारित्र्य, निर्णयाची त्वरीत कार्यवाही, अधिकारी वर्गाची मानसिकता इत्यादी बाबींची नितांत आवश्यकता आहे. या सर्व दृष्टीने प्रस्तुत विषय महत्त्वाचा आहे.

यु.सी. अग्रवाल यांच्या मते, "सुशासन हे शासनाच्या साध्य आणि उद्दिष्टे यांच्याशी बांधलेले असते. ते शासनाच्या साध्य आणि उद्दिष्टांच्या, त्या अनुषंगाने आखलेल्या धोरण आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणी साधते आणि जनतेने शासन संस्थेच्या कार्याच्या गुणवत्तेसाठी केलेला पाठपुरावा, त्यांची जनतेप्रती असलेली बांधिलकी, त्यांचे दृष्टिकोन, वर्तन, प्रामाणिकपणा या सर्व गोष्टींचे असणे म्हणजेच सुशासन होय." थोडक्यात सुशासन आणि ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था एकमेकांवर आधारित या दोन्ही संकल्पना आहेत. कारण स्थानिक स्वराज्य संस्थेद्वारे स्थानिक जनतेचे हित कशामध्ये आहे, हे पाहिले जाते तर सुशासनाद्वारे सुद्धा जास्तीत जास्त लोकांचे जास्तीत जास्त कल्याण कशामध्ये करता येईल हे पाहिले जाते. केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना स्थानिक पातळीवर यशस्वीपणे अमलात आणण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था या महत्त्वाची भूमिका बजावतात आणि स्थानिक भागाचा विकास घडवून आणतात. त्याचबरोबर हा विकास सुशासनामुळे तर अधिक वेगाने होत आहे कारण सुशासन या प्रक्रियेद्वारे शासनाच्या योजना मोठया प्रमाणात यशस्वीरित्या अमलात आणल्या जातात. तसेच सुशासन प्रक्रियेद्वारे स्थानिक

स्वशासन प्रक्रियेत सुद्धा बदल होऊन नागरिकांना अनेक प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. म्हणून प्रस्तुत विषय 'लातूर जिल्ह्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सुशासनाचा चिकित्सक अभ्यास' हा निवडण्यात आला आहे.

- **संशोधन समस्या :**

भारतीय संविधानाप्रमाणे भारतात संसदीय लोकशाही व संघराज्यात्मक शासनव्यवस्था स्वीकारण्यात आलेली आहे. त्यामुळे देशात राष्ट्रीय पातळीवर केंद्र सरकार व राज्य पातळीवरील राज्य सरकार अशी दुहेरी शासनव्यवस्था आहे. त्यामुळे देशात केंद्र व राज्य शासनाने आखलेल्या विविध योजनांची व कार्यक्रमांची अंमलबजावणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून केली जाते. तसेच स्थानिक समस्या सोडविण्याची जबाबदारी व विकासाच्या योजना यशस्वीपणे अंमलात आणण्याची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्थांनाच पार पाडावी लागते. पुर्वी स्थानिक शासन हे गतिमान नव्हते, प्रशासनात दप्तर दिरंगाई, लालफीतशाही, भ्रष्टाचार यासारखे अनेक दोष होते. त्यामुळे हे शासन जनतेसाठी कुचकामी ठरत होते. अलीकडच्या काळात शासन व प्रशासन यामध्ये एक नवा दृष्टिकोन पुढे आला तो म्हणजे सुशासन होय. या संकल्पनेत शासन अधिक गतिमान, कार्यक्षम, पारदर्शक, उत्तरदायित्व, जबाबदारीची जाणीव इ. मूल्यांवर आधारित आहे. यानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या कारभारात सुशासनाचा अवलंब केला आहे का? तसेच लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था सुशासन निर्मितीत यशस्वी झाली आहे काय? याचा अभ्यास प्रस्तुत संशोधन कार्यात केला जाणार आहे.

- **संशोधन महत्त्व :**

आधुनिक काळात स्थानिक स्वराज्य संस्थेला तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सुशासनाला विशेष प्रकारचे महत्त्व प्राप्त झाले आहे. कारण स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सुशासनामुळे स्थानिक पातळीवरील कार्य अगदी कमी वेळेत पूर्ण

केले जात आहे. तसेच स्थानिक नागरिकांना जास्तीत जास्त शासकीय सेवेसंबंधी माहिती स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे दिली जाते. तसेच स्थानिक पातळीवर शासन व प्रशासनात नागरिकांचा वाढता सहभाग यासाठी सुद्धा स्थानिक स्वराज्य संस्था प्रयत्न करीत आहेत. यामुळे प्रस्तुत संशोधन कार्याला महत्त्व प्राप्त झाले आहे.

माहिती आणि तंत्रज्ञानाच्या प्रभावाने स्थानिक स्वराज्य संस्थांनी देखील आपल्या कार्यात मोठ्या प्रमाणात बदल केला आहे. ज्यामध्ये ई-प्रशासन (गर्व्हनन्स), नागरिकांची सनद, माहितीचा अधिकार, सुशासन आराखडा इ. शासकीय प्रक्रियेतील नवीन संकल्पनांमुळे नागरिकांचे जीवनमान सुखकारक बनविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना आपले कार्य पार पाडताना कोणत्या समस्येला सामोरे जावे लागते या समस्यांचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधनाचे महत्त्व आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे :**

संशोधन समस्येचे अध्ययन करीत असताना अनेक पैलूंचा अभ्यास करावा लागतो. त्यामुळे संशोधनाला योग्य दिशा आणि गती प्राप्त होऊ शकते. म्हणून प्रस्तुत संशोधनाचा मुख्य उद्देश लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा व सुशासनाचा अभ्यास करणे हा आहे. याशिवाय संशोधन कार्याची पुढील उद्दिष्टे संशोधन कार्यापुढे ठेवण्यात आलेली आहेत.

1) स्थानिक स्वराज्य संस्थेची ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.
2) लातूर जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा अभ्यास करणे.
3) सुशासनाचा उदय व विकास यांचा अभ्यास करणे.
4) सुशासनाची स्थानिक स्वराज्य संस्थेतील अंमलबजावणी अभ्यासणे.
5) सुशासनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

6) लातूर जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून माहितीचा अधिकार, नागरिकांची सनद, ई-प्रशासन या संकल्पना लागू करण्यात आलेल्या आहेत का याचे अध्ययन करणे.

- **गृहितके :**

संशोधन कार्य कोणत्याही प्रकारचे असो त्यात गृहितकृत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. गृहिकृत्य हे एक असे विधान मानले जाते की जे संशोधन सुरू करण्यापूर्वी मांडले जाते व शेवटी संशोधनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांशी जोडून पाहिजे जाते. त्यावरून संशोधनाचे यशापयश माजले जाते. प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितकृत्यांचा आधार घेतला आहे.

1) सुशासनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत आमुलाग्र बदल झाला आहे.

2) सुशासनामुळे जनता, शासन आणि प्रशासन यांच्यात जवळीकता वाढली आहे.

3) सुशासनामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेत पारदर्शकता आलेली आहे.

4) सुशासनामुळे प्रशासनात तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे.

5) सुशासनामुळे जनतेचा शासनावरील विश्वास वाढला आहे.

6) सुशासनामुळे स्थानिक विकासाला गती मिळाली आहे.

7) सुशासनामुळे शासकीय योजनांची अंमलबजावणी व त्यामुळे होणारे लाभ जनतेला तत्पर मिळत आहेत.

8) सुशासनामुळे जनतेच्या वेळ व पैशाची बचत होऊन भ्रष्टाचाराला आळा बसला आहे.

- **संशोधन विषयाची व्याप्ती :**

संशोधन कार्यात निश्चित असा आधार प्राप्त होण्यासाठी संशोधनाची व्याप्ती निश्चित करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधन कार्यात लातूर जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात, प्रशासकीय व्यवस्थेत सुशासनामुळे काय बदल झालेले

आहेत? याचे अध्ययन करण्यात येणार आहे. तसेच लातूर जिल्हयातील काही निवडक स्थानिक स्वराज्य संस्थांचा सूक्ष्मपणे अभ्यास करून सुशासनामुळे जनतेला दिल्या जाणाऱ्या सेवांच्या दर्जावर काय परिणाम होणार आहे हे देखील अभ्यासले जाणार आहे.

- **नमुना निवड:**

प्रस्तुत संशोधनाच्या अध्ययनाचे विश्व व एकक निश्चित स्वरूपात माहित असल्यामुळे अध्ययनासाठी संभाव्य नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे. संशोधकाने प्रस्तुत संशोधनासाठी लातूर जिल्हयातील शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अनुषंगाने लातूर जिल्हा परिषद, 05 पंचायत समित्या, 05 नगर परिषदा, प्रत्येक तालुक्यातील 05 ग्रामपंचायती अशा एकूण 50 ग्रामपंचायती यांची लॉटरी पद्धतीने संशोधन क्षेत्रासाठी निवड करण्यात येणार आहे.

- **संशोधन पद्धती :**

सामाजिक शास्त्रातील कोणतेही संशोधन हे दर्जेदार व सूत्रबद्ध रीतीने पूर्ण होण्यासाठी संबंधित संशोधनासाठी योग्य संशोधन पद्धतीचा अवलंब करणे खूप गरजेचे असते. 'लातूर जिल्हयाच्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील सुशासनाचा चिकित्सक अभ्यास' या विषयावरील संशोधन नि:पक्षपातीपणे व वस्तुनिष्ठ व्हावे यासाठी निरीक्षण, अवलोकन व ग्रंथालयीन अध्ययन पद्धती या साधनांचा अवलंब करण्यात येणार असून सदर संशोधनासाठी आवश्यक त्या माहितीचे संकलन प्राथमिक व दुय्यम स्रोतांच्या आधारे करण्यात येणार आहे. लातूर जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या काही सामान्य नागरिकांना प्रश्नावलीच्या माध्यमातून प्रश्न विचारून उत्तरसूचीमार्फत संशोधन कार्य करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वर्णनात्मक व सांख्यिकीय विश्लेषण् पद्धतीचाही आवश्यकतेनुसार अवलंब करण्यात येणार आहे.

- **तथ्य संकलन :**

तथ्य संकलन हा संशोधन कार्यातील अनिवार्य भाग आहे. प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करत असताना दोन पद्धतीने तथ्य संकलन करण्याचे योजले आहे.

अ) प्राथमिक स्रोत : प्राथमिक स्त्रोत हा संशोधनाचा मुख्य आधार असतो. तथ्य संकलनाच्या प्राथमिक स्त्रोतांमध्ये प्रश्नावली, मुलाखत, अनुसूची, निरीक्षण या स्त्रोतांचा वापर करण्यात येणार आहे.

ब) द्वितीय स्त्रोत : प्रस्तुत कार्यासाठी प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने प्रकाशित व अप्रकाशित लिखाण, अहवाल, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, शासनाच्या विविध योजना, शासकीय दस्ताऐवज, विविध ग्रंथ, साप्ताहिके, विविध वर्तमानपत्रातील लेख, शोधनिबंध, इंटरनेटवरील माहिती या सर्व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी केला जाणार आहे.

- **तथ्यांचे विश्लेषण :**

सामाजिकशास्त्रातील संशोधनात तथ्यांचे संकलन केल्यानंतर तथ्यांचे विश्लेषण करणे गरजेचे आहे. कारण त्याशिवाय संकलित केलेल्या तथ्यांचा, अर्थबोध होत नाही. प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांच्या आधारे संकलित केलेल्या तथ्यांचे विश्लेषण ही संशोधनातील एक महत्त्वाची पायरी आहे. त्याशिवाय संशोधन पूर्ण होत नाही व त्यास योग्य अर्थ प्राप्त होत नाही. त्यामुळे तथ्यांच्या आधारे संकलित केलेल्या माहितीचे विश्लेषण योग्य पद्धतीने करण्यात येणार आहे.

- **साहित्याचे पुनरावलोकन :**

1) Ali A.S. (2006) 'Kautilya and the concept of Good Governance', Indian Journal of Political Science प्रस्तुत लेखात लेखकाने राज्यशास्त्रात सुशासन संकल्पनेचे महत्त्व सांगून सुशासनाचे बरेच गुण विकसित व विकसनशील देशात कसे फायद्याचे झाले आहेत इ. संबंधी माहिती दिली आहे.

2) Singh Walmiki Prasad (2008) 'The Challange of Good Governance in Indian Social Change' प्रस्तुत लेखात लेखकाने सुशासनासंबंधी वर्णन केले आहे. तसेच सुशासनाची वैशिष्ट्ये, सुशासन निर्माण करण्यात येणाऱ्या समस्या, सुशासनाचे घटक, सुशासन निर्माण करण्यासाठी न्याय, समानता, स्वातंत्र्य, पारदर्शकता इ. घटकांसंबंधी माहिती लेखकाने दिली आहे.

3) Mohpatra Kumar Amay (2014) 'Role of Panchayat Raj Samiti in Panchayatraj, Kurukshetra' प्रस्तुत लेखात लेखकाने जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत संबंधी माहिती दिली आहे. त्यामध्ये जिल्हा परिषदेची भूमिका, पंचायत समितीची कार्ये व भूमिका आणि ग्रामपंचायतीसंबंधी माहिती प्रस्तुत लेखात लेखकाने दिली आहे.

4) मार्कंड अधिकारी (2015) 'सुशासनाला जोड आत्मविश्वासाची', गव्हर्नन्स नाऊ, प्रस्तुत लेखात लेखकाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुशासनावर भर दिल्याने देशात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे असे म्हटले आहे. तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत सरकारी योजना आणि उपक्रमांचे फायदे पोहचू शकले तरच सुशासन अवतरले असे म्हणता येईल. तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नेमून दिलेली कामे प्रामाणिकपणे केली तरच हे शक्य आहे. तसेच सुशासनाची प्रक्रिया गतिमान करण्यासाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना, अभ्यासगट, युवक फोरम, महाविद्यालये तसेच ग्रामपंचायतींना सहभागी करून घेतले जाते. त्यामुळे सुशासनाची प्रक्रिया गतिमान होत आहे असे लेखकाने नमूद केले आहे.

5) प्रा.मिरकुटे एकनाथ गोविंदराव (जुलै 2020), 'माहितीचा अधिकार आणि सुशासन : नांदेड जिल्हा परिषद एक अभ्यास', पीएच.डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड प्रस्तुत प्रबंधात संशोधकाने माहितीचा अधिकार आणि सुशासन या अनुषंगाने नांदेड जिल्हा परिषदेत त्याची अंमलबजावणी कशी

करण्यात आली, सुशासन म्हणजे काय, सुशासनाचे मूल्य, घटक इ. बाबींचा सविस्तर अभ्यास केलेला आहे.

- **प्रकरण मांडणी:**

प्रस्तुत संशोधन विषयाची प्रकरणनिहाय मांडणी खालीलप्रमाणे करण्यात येणार आहे.

प्रकरण पहिले - प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, संशोधन समस्या, संशोधनाचे महत्त्व, उद्दिष्ट्ये, संशोधनाची गृहितके, संशोधनाची व्याती, नमुना निवड, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, तथ्य सादरीकरण व विश्लेषण, पूर्व संशोधनाचा आढावा इ. सर्व घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे -स्थानिक स्वराज्य संस्था उदय व विकास

प्रस्तुत प्रकरणामध्ये ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचा इतिहास, स्थानिक स्वराज्य संस्थांचा अर्थ, व्याख्या, महत्त्व, कार्य, वैशिष्ट्ये, स्थानिक स्वराज्य संस्थेने ग्रामीण व शहरी विकासातील योगदान, 73 वी 74 वी घटनादुरूस्ती इ. सर्व घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे - सुशासन संकल्पना : उदय व विकास

प्रस्तुत प्रकरणामध्ये सुशासन संकल्पनेचा अर्थ, व्याख्या, वैशिष्ट्ये, सुशासनाची मूल्ये, सुशासन निर्मितीचे घटक तसेच सुशासनाचे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारातील योगदान इ. सर्व घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे-लातूर जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेत सुशासनाची अंमलबजावणी

प्रस्तुत प्रकरणामध्ये माहितीचा अधिकार, ई-गव्हर्नन्स, नागरिकांची सनद, नागरिकांचा प्रशासनातील सहभाग इत्यादी घटकांच्या अनुषंगाने स्थानिक स्वराज्य

संस्थेत सुशासनाची परिणामकारक अंमलबजावणी कशी करण्यात आली याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे -स्थानिक स्वराज्य संस्थेवर सुशासनाचा झालेला परिणाम

प्रस्तुत प्रकरणामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेवर सुशासनाचा झालेला परिणाम अभ्यासण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : निष्कर्ष व शिफारशी

प्रस्तुत प्रकरणात पाचही प्रकरणांती हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करून काही शिफारशी करण्यात येणार आहेत. शेवटी संदर्भ ग्रंथ सूचीसह काही परिशिष्ट्ये जोडण्यात येणार आहेत.

संदर्भ ग्रंथ सूची

1) पाटील वा.भा. (2009), स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव

2) पोहेकर प्रीती (2008), लोकप्रशासनाचाची मूलतत्त्वे, अरूणा प्रकाशन, लातूर

3) डॉ.नितीन बिस्मल व डॉ.वैशाली पवार, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

4) प्रा.व्ही.बी. पाटील (2005), महाराष्ट्रातील पंचायतराज, नागरी व स्थानिक स्वराज्य संस्था, के.सागर पब्लिकेशन, पुणे

5) प्रा.र.घ. वराडकर, महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, निराली प्रकाशन

6) आगलावे प्रदीप (2000), संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर

7) पाटील अजय (2002), 73 वी घटनादुरुस्ती व महिला नेतृत्व : विशेष संदर्भ लातूर जिल्हा, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

8) प्रा.मिरकुटे एकनाथ गोविंदराव (2020), माहितीचा अधिकार आणि सुशासन- नांदेड जिल्हा परिषद एक अभ्यास, अप्रकाशित पीएच.डी. शोधप्रबंध, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

9) लातूर जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

10) भारतीय जनगणना अहवाल 2001 आणि 2011

संकेतस्थळे

1) www.zplatur.gov.in

2) www.sahyadribooks.com

3) https://panchayat.gov.in

4) www.govtofmaharashtra.in

संशोधक

बालाजी दिगंबर बिरादार
शिवाजी महाविद्यालय, उदगीर

मार्गदर्शक

प्रा.डॉ. संजय मारोतीराव कोनाळे
राज्यशास्त्र विभाग
शिवाजी महाविद्यालय, उदगीर
ता.उदगीर जि.लातूर.